जा.क्र.साआ/कक्ष-१३/सहवि.नि.प्र./परिपत्रक/०११
साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५.
दिनांक -७/०८/११

# परिपत्रक

विषय - यंत्र सामुग्री खरेदी व स्थापत्य कामाच्या निविदा प्रक्रिया पार पाडताना विचारात घ्यावयाच्या बाबी.

सहविज निर्मिती प्रकल्पास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळाल्यानंतर आवश्यक ती यंत्रसामुग्री खरेदी तसेच स्थापत्य कामासाठी निविदा मागविताना खालील प्रमाणे सुचना अंमलात आणणे बंधनकारक आहे.

**१. जाहिरात**

| | | |
|---|---|---|
| १ | रुपये ५ लाखापर्यंत | स्थानिक वृतपत्र |
| २ | रुपये ५ ते ५० लाखापर्यंत | जिल्हा व राज्यस्तरीय (मराठी वृतपत्र) |
| ३ | ५० लाख व त्यावरील | जिल्हा व राज्यस्तरीय (मराठी वृतपत्र) तसेच राज्यस्तरीय इंग्रजी. |

**२. निविदा सूचना कालावधी**

| अ.क्र. | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | कालावधी | |
|---|---|---|---|
| | | प्रथम सुचना | व्दित्तीय सुचना |
| १ | ५ लाखापंक्षा कमी किंमतीची कामे | ८दिवस | ५दिवस |
| २ | ५ ते ५० लाख किंमतीची कामे | १५दिवस | ८दिवस |
| ३ | ५० लाखपेक्षा जास्त किंमतीची कामे | २५दिवस | १५दिवस |

**३. निविदा विक्रीचा अंतिम दिनांक व भरलेल्या निविदा सादर करण्यासाठीचा कमीत कमी कालावधी खालीलप्रमाणे.**

| अ.क्र. | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | कालावधी |
|---|---|---|
| १ | रुपये १२५ लाखापर्यंत | ४ दिवस |
| २ | रुपये १२५ लाखावरील सर्व | ७ दिवस |

**४. बयाना रक्कम (E.M.D.)**

| | | |
|---|---|---|
| १ | रुपये १ कोटी पर्यंत | १% |
| २ | रुपये १ ते २ कोटीपर्यंत | ०.७५ % किंवा कमीत कमी १ लाख यापैकी जे जास्त असेल त |
| ३ | रुपये २ कोटीवरील | ०.७५ % किंवा कमीत कमी १.५ लाख यापैकी जे जास्त असेल ते |

५. कोऱ्या निविदा संचाच्या विक्रीचे दर

| अ.क्र. | काँट्रक्ट रक्कम | निविदा संचाची किंमत |
|---|---|---|
| १ | रुपये १५ लाखापर्यंत | रुपये ५००/- |
| २ | रुपये १५ ते ५० लाखापर्यंत | रुपये १०००/- |
| ३ | रुपये ५० ते २०० लाखापर्यंत | रुपये ५०००/- |
| ४ | रुपये २०० ते ५०० लाखापर्यंत | रुपये १००००/- |
| ५ | रुपये ५०० ते १००० लाखापर्यंत | रुपये १५०००/- |
| ६ | रुपये १००० ते ५००० लाखापर्यंत | रुपये २५०००/- |
| ७ | रुपये ५००० लाखापेक्षा जास्त | रुपये ५००००/- |

**६. तसेच निविदा प्रक्रिया पारदर्शी व सुरळीतपणे पार पाडण्यासाठी खालील प्रमाणे सुचना लक्षात घ्याव्यात.**

१. निविदापूर्व बैठक (प्री बीड मिटींग ) व निविदा विक्रीचा शेवटचा दिवस यांच्यात कमीत कमी अंतर ८ दिवस असले पाहिजे.

२. प्रीबीड मिटींगच्या दोन दिवस अगोदर सर्व संबधित पुरवठादार / ठेकेदार यांच्या काही शंका (Querries) असल्यास लेखी स्वरुपात ई-मेल, फॅक्स, कुरिअर व टपालाद्वारे प्राप्त करुन घ्याव्यात. जेणेकरुन प्रीबीड बैठकीमध्ये सर्व पुरवठादार / ठेकेदार यांचे समक्ष सर्व शंकाचे निराकरण होईल. प्रीबीड मिटींगचे वेळी कारखान्याने नेमणुक केलेल्या वास्तुविशारद अथवा तांत्रिक सल्लागार यांनी उपस्थित राहणे बंधनकारक राहील.

३. प्रीबीड बैठकीमध्ये संबधित पुरवठादार / ठेकेदार यांनी उपस्थित केलेल्या शंकाचे मुद्दे व त्यास अनुसरुन कारखान्याने केलेले शंकाचे निरसन इ. बाबतच्या तपशिलासह बैठकीचे इतिवृत्त तयार करुन त्यावर सर्व संबधिताच्या स्वाक्षरी घेण्यात याव्या.सर्व प्रीबीड क्युरीजचे उत्तर एकत्रित करुन सर्व पुरवठादार / ठेकेदारांना देण्यात यावे व त्याची एक प्रत साखर आयुक्त कार्यालयास पाठवुन देणेत याव्यात.

४. तांत्रिक देकार (Technical Bid) प्राप्त झाल्यानंतर सर्व बीडचा मुल्यांकन अहवाल (Evalution report) तयार करण्यात यावा. आणि त्यावर मुल्याकंन करणाऱ्या सर्व संबधित अधिकारी व सल्लागार यांची स्वाक्षरी घेण्यात यावी.

५. प्राप्त देकार (Bid) अपेक्षित टेक्नीकल स्पेशिफिकेशन प्रमाणे असल्याबाबत खात्री करावी.

६. प्राप्त देकार (Bid) च्या अनुषंगाने केलेल्या तांत्रिक मुल्याकंनाबाबत संबधित पुरवठादार / ठेकेदार यांची काही हरकत अथवा तक्रार असु नये. याबद्दल खात्री करण्यात यावी.तांत्रिक मुल्यांकन झालेनंतरच वाणिज्य देकार (Commercial Bid) समितीमार्फत उघडणेत येतील.

साखर आयुक्त
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रती

कार्यकारी संचालक

----------------सहकारी साखर कारखाना लि. ---------

ता.------------ जि.----------------------------------